**सोलापूर महानगरपालिका**
**सभेचा इतिवृत्तांत**
**(मा.स्थापत्य समिती संदर्भ)**
**उप-समिती बैठक क्रमांक -३७**

सोलापूर महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.०४.०८.२०२२ रोजी सायंकाळी ८.०० वाजता मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.
सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्री.संदिप कारंजे | नगर अभियंता |
| ५ | मा.श्री.संजय धनशेट्टी | सार्व.आरो.अभियंता |

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | १४ | स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा ट्रान्सफर स्टेशन तयार करणे (Civil Work) प्रस्तावात नमूद ४ ठिकाणी ट्रान्सफर स्टेशन करणे बाबतचे कामाचे पुर्वगणनपत्रकास तांत्रिक मान्यता घेणेत आलेली असून त्याप्रमाणे पुर्वगणनपत्रक मान्येतस्तव **मा.स्थापत्य समिती व मा.सर्वसाधारण सभेकडे** पाठविणे आवश्यक आहे. (बजेट - सध्या सदर कामी येणारा खर्च हा सध्या मा.शासनाकडून मंजूर झालेल्या पेक्षा जास्त असल्यामुळे अत्याधुनिक पध्दतीचे ट्रान्सफर स्टेशन उभे करणे कामी अधिकच्या निधीची मागणी मा.आयुक्त यांनी जा.क्र.घ.क.व्य./१४३९ दि.२२/११/२०२१ ने मा.शासनाकडे पत्र पाठविले आहे. मा.शासनाकडून सुधारीत प्रस्तावानूसार अधिकचा निधी मिळेपर्यंत सदरचा होणारा अधिकचा खर्च एकुण अंदाजे र.रु.१४.१४ कोटी इतका निधी मा.शासनाकडून प्राप्त असलेल्या १४ वे व १५ वे वित्त आयोगातून खर्ची टाकणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मा.मुख्यलेखापाल यांचा बजेट अभिप्राय घेणेचे आहे) परंतू **मा.स्थापत्य समिती व मा.सर्वसाधारण सभा** अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने मा.प्रशासक यांचेकडे मान्यतेस्तव पाठविणेकामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांच्याकडे मान्यतेस्तव सादर करणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२९/०७/२०२२ रोजीच्या मान्यतेने | नगर अभियंता | **प्रकरणी Civil Work व Mechanical Work या दोन्ही प्रकराच्या कामाचे पूर्वगणनपत्रक एकत्रित सादर करावे व या कामी लागणारा निधी बाबत खुलासासह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | आलेले प्रकरण **(ई-६२३४८) CE** | | |
| २ | १५ | प्रभाग क्र.१९ बत्तुल नगर व्यंकटेश नगर कामाक्षी नगर उषा नगर आरती नगर आडम प्लॉट नक्का वस्ती दिनदयाळ नगर व परिसर येथे पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन घालणे या कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.९७/२०२१-२२ र.रु.३९,९९,७६५/- इतकीचे तयार केले असून त्यास मा.सार्वजनिक आरोग्य अभियंता तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. सदरचे काम हे १५ वे वित्त आयोग शासन प्राप्त अनुदानातून करणेचे आहे. सदरचे पूर्वगणनपत्रकास सक्षम मंजूरीस्तव मा.स्थापत्य समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतू मा.स्थापत्य समिती अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने मा.प्रशासक यांचेकडे मंजूरीस्तव पाठविणेकामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मंजूरीस्तव** सादर करणे कामी मा.आयुक्त यांचे दि.०३/०८/२०२२ ने आलेले प्रकरण **(ई-६०४३४) PHE** | ~~सहा.आयुक्त~~, ~~भू व मा~~ | **प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |

**मा.नगर अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.सार्व.आरो.अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका**

**नगर सचिव**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.मुख्यलेखापरिक्षक**
**सोलापूर महानगरपालिका**

**मा.अति.आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**

सोलापूर महानगरपालिका
प्रशासक ठराव
(स्थापत्य समिती संदर्भ)
विषय क्र.१४ ठराव क्र.१४ दिनांक.०४/०८/२०२२

१४

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा ट्रान्सफर स्टेशन तयार करणे (Civil Work) प्रस्तावात नमूद ४ ठिकाणी ट्रान्सफर स्टेशन करणे बाबतचे कामाचे पुर्वगणनपत्रकास तांत्रिक मान्यता घेणेत आलेली असून त्याप्रमाणे पुर्वगणनपत्रक मान्येतस्तव **मा.स्थापत्य समिती व मा.सर्वसाधारण सभेकडे** पाठविणे आवश्यक आहे. (बजेट - सध्या सदर कामी येणारा खर्च हा सध्या मा.शासनाकडून मंजूर झालेल्या पेक्षा जास्त असल्यामुळे अत्याधुनिक पध्दतीचे ट्रान्सफर स्टेशन उभे करणे कामी अधिकच्या निधीची मागणी मा.आयुक्त यांनी जा.क्र.घ.क.व्य./१४३९ दि.२२/११/२०२१ ने मा.शासनाकडे पत्र पाठविले आहे. मा.शासनाकडून सुधारीत प्रस्तावानूसार अधिकचा निधी मिळेपर्यंत सदरचा होणारा अधिकचा खर्च एकुण अंदाजे र.रु.१४.१४ कोटी इतका निधी मा.शासनाकडून प्राप्त असलेल्या १४ वे व १५ वे वित्त आयोगातून खर्ची टाकणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मा.मुख्यलेखापाल यांचा बजेट अभिप्राय घेणेचे आहे) परंतू **मा.स्थापत्य समिती व मा.सर्वसाधारण सभा** अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने मा.प्रशासक यांचेकडे मान्यतेस्तव पाठविणेकामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांच्याकडे **मान्यतेस्तव** सादर करणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२९/०७/२०२२ रोजीच्या मान्यतेने आलेले **प्रकरणी Civil Work व Mechanical Work या दोन्ही प्रकराच्या कामाचे पूर्वगणनपत्रक एकत्रित सादर करावे व या कामी लागणारा निधी बाबत खुलासासह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूरमहानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका ★ मा.प्रशासक कार्यालय ★

(पि.शिवशंकर, भा.प्र.से)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
प्रशासक ठराव
(स्थापत्य समिती संदर्भ)
विषय क्र.१५ ठराव क्र.१५ दिनांक.०४/०८/२०२२

१५

प्रभाग क्र.१९ बत्तुल नगर व्यंकटेश नगर कामाक्षी नगर उषा नगर आरती नगर आडम प्लॉट नक्का वस्ती दिनदयाळ नगर व परिसर येथे पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन घालणे या कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.९७/२०२१-२२ र.रु.३९,९९,७६५/- इतकीचे तयार केले असून त्यास मा.सार्वजनिक आरोग्य अभियांता तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. सदरचे काम हे १५ वे वित्त आयोग शासन प्राप्त अनुदानातून करणेचे आहे. सदरचे पूर्वगणनपत्रकास सक्षम मंजूरीस्तव मा.स्थापत्य समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतू मा.स्थापत्य समिती अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने मा.प्रशासक यांचेकडे मंजूरीस्तव पाठविणेकामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे मंजूरीस्तव सादर करणे कामी मा.आयुक्त यांचे दि.०३/०८/२०२२ ने आलेले **प्रकरणास मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूरमहानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका * मा.प्रशासक कार्यालय *

(पि.शिवशंकर, भा.प्र.से)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका